# <u>मे. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर उदगीर यांचे न्यायालयात</u>

दि.दा.क्र.118/2026

देविदास

<u>विरूध्द</u>

माधव

**दावा : वाटणी होवून स्वतंत्र ताबा मिळणे बाबत**

## <u>तडजोडपत्र</u>

वादी व प्रतिवादी आपली तडजोड मे. न्यायालयात खालीलप्रमाणे दाखल करीत आहेत.

1. हे की, वादी व प्रतिवादी हे आपापसात सख्खे भाऊ असुन तो त्यांच्या व्यवसायानिमित्ताने मुंबई येथे वास्तव्यास आहेत. वादी व प्रतिवादी यांचे भविष्यातील संबंध कायम चांगले सलोख्याचे राहावेत या दृष्टीकोनातुन प्रतिष्ठित पंचानी व वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोड घडवून आणली आहे जी उभय पक्षांना मान्य व कबूल आहे.

2. हे की, सदर तडजोडीनुसार वादी व प्रतिवादी यांनी त्यांच्या संयुक्त उत्पन्नातुन दाव्यातील वादग्रस्त प्लॉट हा खरेदी घेतल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे. खरेदीखतावेळी वादी हे त्यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे हजर राहु न शकल्यामुळे वादग्रस्त प्लॉटचे प्रतिवादी यांच्या एकटयाचे नावाने खरेदीखत करण्यात आले होते हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

3. हे की, वादी व प्रतिवादी यांच्यात झालेल्या तडजोडीनुसार दाव्यातील वादग्रस्त प्लॉट मौजे निडेबन ता. उदगीर जि. लातूर येथील जमीन सर्वे नं. 21 मधील प्लॉट क. 63 ज्याचा ग्राम पंचायत मालमत्ता क.1795 ज्याचे क्षेत्र पुर्व पश्चिम 30 फुट, दक्षिण उत्तर 45 फुट एकुण क्षेत्रफळ 1350 चौ.फुट ज्याची चतुर्सिमा :—

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | — | प्लॉट क. 59 |
| पश्चिमेस | — | शेटकार यांची जागा |
| दक्षिणेस | — | 15 फुटाचा रस्ता |
| उत्तरेस | — | प्लॉट क. 64 |

T.I. verified by me

ही प्लॉट मिळकत वादीच्या वाटणी हिश्यास देण्यात आलेली आहे जे प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

4. हे की, वादी व प्रतिवादी हे मौजे बामणी ता. मुखेड येथील रहीवाशी असुन त्यांना त्यांचे मुळ गावी देखील स्थावर मालमत्ता आहेत. त्या मालमत्तेमध्ये प्रतिवादी यांना हिस्सा देण्यात आलेला आहे. तसेच वादग्रस्त मिळकत ही दोघांना राहण्यासाठी सोयीची नसल्यामुळे प्रतिवादी यांना वादग्रस्त मिळकतीतील त्यांचा हिस्सा नैसर्गिक प्रेमापोटी वादीच्या हक्कात कायमस्वरूपी सोडून दिलेला आहे जे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबुल आहे.

T.I. verified by me.

3. हे की, सदर तडजोडीनुसार वादी यांनी वादग्रस्त प्लॉटवर मालकी नात्याने काबीज राहून उपभोग घेत जावे तसेच सदर तडजोडीनुसार ग्राम पंचायत व महसुल रेकॉर्डला स्वतःच्या नावाने स्वतंत्र मालकीचा अंमल लावून घ्यावा त्यास प्रतिवादीची कसलीही हरकत, उजर अथवा तक्रार राहणार नाही हे उभय पक्षांना मान्य व कबुल आहे.

4. हे की, सदर तडजोडीचा खर्च ज्याचे त्यांनी सोसावे.

## <u>तरी विनंती की</u>

मे. साहेबांनी सदरची तडजोड स्विकृत करून वादीचा दावा तडजोडीनुसार डिक्री करण्याची कृपा करावी.

दिनांक : 14/03/2026

T.I. verified by me

वादी

देविदास पि. नागोराव शिंदे
रा. बामणी ता. मुखेड जि. नांदेड
हा.मु. रूम नं.296, डॉ.बी.आर. आंबेडकर नगर, कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग, कुलाबा मुंबई

T.I. verified by me

T.I. verified by me

प्रतिवादी

माधव पि. नागोराव शिंदे
रा. बामणी ता. मुखेड जि. नांदेड
हा.मु. रूम नं.296, डॉ.बी.आर. आंबेडकर नगर, कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग, कुलाबा मुंबई

T.I. verified by me

वादीचे वकील

**ॲड. एस. एन. राचलवार**
उदगीर

प्रतिवादीचे वकील

**ॲड. आर. बी. मुंढे**
उदगीर

**BEFORE THE RASHTRIYA LOK NYAYALAY**
**HELD AT UDGIR, DIST. LATUR**
(Panel No.3)

(Organized by National Legal Services Authority/Maharashtra State Legal Service Authority under Section 19 of the Legal Services Authorities Act, 1987)

Petitioner/Plaintiff/Complainant : Devidas Nagorav Shinde

Defendant/Respondent : Madhav Nagarav Shinde

No. of the proceedings : RCS No. 118 / 2026

Present:-

Name of the Judicial Officer : Shri. Bhalchandra R. Zende (3rd Jt. CJJD and JMFC, Udgir)

Name of Member/s : Adv. Smt. A. R. Shaikh

**AWARD**

The dispute between the parties having been referred for determination to the Rashtriya Lok Nyayalay and the parties having compromised/settled the matter, in view of compromise pursis at Exh. 09. Thus, the following award is passed in terms of the settlement :

1. The suit stands disposed of in terms of the compromise pursis (Exh. 09).
2. Issue precept to the Sub-Registrar, Office Udgir, under Section 89-A of the Indian Registration Act, 1908, for registration of the Award, if so required.
3. It is clarified that the Revenue Authority shall be at liberty to raise objections, if any, under the provisions of the Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947.
4. In view of Section 21(1) of the Legal Services Authorities Act, 1987 and Section 16 of the Court Fees Act, 1870, the plaintiff is entitled to a full refund of the court fees paid.
5. Issue Court Fee Refund Certificate accordingly.

Plaintiff/s — Defendant/s

T.I. verified by me

T.I. verified by me

तालुका विधी सेवा समिती उदगीर

(Signature of Judicial Officer 14.3.2026)

(Signature of Member)

Date : 14.03.2026

(Seal of the Authority/Committee)